**नि. फौ. ख. क्र. १२/२०२१**
**सखुबाई वि. जगन्नाथ व इतर**
**निशाणी क्र. ३६**

**<u>तक्रारदारतर्फे साक्षीदार क्र.०३ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | विनायक भागवत सोनलकर |
| **वय** | :– | २५ वर्षे, **धंदा** :– सह दुय्यम निबंधक आटपाडी |
| **राहणार** | :– | मेडसींगी, ता. सांगोला, जि. सांगली. |

**<u>सरतपासणी तक्रारदारतर्फे – श्री. व्ही. बी. पाटील , विद्यमान वकील यांच्यामार्फत</u>**

१. मला साक्षकामी समन्स प्राप्त झाले आहे. मी दिनांक १८/०८/२०२५ रोजी आटपाडी कार्यालयात सह दुय्यम निबंधक म्हणून रुजू झालो आहे. मी कार्यालयाचा पदभार स्विकारलेला आहे.

२. समन्समध्ये नमुद केलेला दस्त सन २००८ साली आमच्या कार्यालयात नोंदणीकृत झाला होता त्याबाबतचा मुळ अभिलेख मी आज सोबत आणला आहे. सदर दस्त दिनांक २३/०९/२००८ रोजीचा असून लिहून देणार म्हणून जगन्नाथ श्रीमंत गळवे आणि संजय विठोबा माळी आणि लिहून घेणार म्हणून सखुबाई महादेव खिलारी या होत्या. सदर दस्त हा गळवेवाडी येथील गट नं. १५४, एकूण क्षेत्र– ५ हेक्टर ७९ आर असून त्यापैकी विक्री केलेले क्षेत्र् १ हे.९६ आर. एवढे आहे. सदर दस्ता हा खरेदीखताचा दस्त आहे. सदर दस्ताचा नोंदणी क्र. १२४२/२००८ आहे. सदर दस्त आटपाडी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत झलेला आहे. सदरील दस्तीा प्रमाणीत प्रत मी आज वर्णन यादी निशाणी ३७/१ वर दाखल केली आहे. सदर प्रमाणीत प्रतीमधील मजकूर मी सोबत आणलेल्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. सदर दस्तावर प्रमाणीत प्रत म्हणून माझी सही आहे व कार्यालयाचा शिक्का आहे. सदर दस्तास **<u>निशाणी ३८</u>** देण्यात येते.

३. समन्समध्ये नमुद असल्याप्रमाणे मी सन २०१४ साली आमच्या कार्यालयात गहाणखताचा नोंदणीकृत झालेल्या दस्ताचा अभिलेख सोबत आणला आहे

आणि त्या गहाणखताची प्रमाणीत प्रत वर्णन यादी ३७/२ वर दाखल केली आहे. सदर गहाणखत हे दिनांक २९/०५/२०१४ रोजी जगन्नाथ श्रीमंत गळवे यांनी शाखा अधिकारी निर्मलकुमार नानासाहेब जुगदर, मनमंदीर को.ऑप. बँक लि. शाखा – आटपाडी यांच्या हक्कात लिहून दिलेला आहे आणि त्या दस्तावर जामीनदार म्हणून बलभिम ईश्वर गळवे आणि श्रावण बापू खांडेकर यांची नावे नमुद आहेत. सदर गहाणखताचा दस्त हा मौजे गळवेवाडी येथील गट क्र. १५४ चे एकूण क्षेत्र ५ हे. ७९ आर. पो.ख. –९ आर पैकी कर्जदाराचे क्षेत्र ९५.७० आर. (जगन्नाथच्या हिश्याचे) क्षेत्राचे गहाणखत करुन दिलेले आहे. सदर गहाणखताची प्रत मुळ अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे. सदर प्रतीवर माझी प्रमाणीत प्रत म्हणून सही आहे व आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३९** देण्यात येते.

४. समन्समध्ये नमुद असल्याप्रमाणे मी सन २०१८ साली आमच्या कार्यालयात खरेदीखताचा नोंदणीकृत झालेल्या दस्ताचा अभिलेख सोबत आणला आहे आणि त्या खरेदीखताची प्रमाणीत प्रत वर्णन यादी ३७/३ वर दाखल केली आहे. सदर खरेदीखत हे दिनांक २७/०३/२०१८ रोजीचा असून लिहून देणार म्हणून जगन्नाथ श्रीमंत गळवे यांच्यातर्फे विशेष वसुली अधिकारी– विश्रांत वासुदेव शितोळे, मनमंदीर को.ऑप. बँक लि. विटा यांनी लिहून घेणार म्हणून प्रशांत विश्वानाथ पाटील यांच्या हक्कात लिहून दिलेला आहे. सदर खरेदीखताचा दस्त हा मौजे गळवेवाडी येथील गट क्र. १५४ चे एकूण क्षेत्र ५ हे. ७९ आर. पो.ख. –९ आर. पैकी ९४ आर. क्षेत्राचे खरेदीखत करुन दिलेले आहे. सदर खरेदीखताची प्रत मुळ अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे. सदर प्रतीवर माझी प्रमाणीत प्रत म्हणून सही आहे व आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४०** देण्यात येते. सदर तिनही दस्त आमच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहेत.

५. मी सदर तिनही दस्तांचे इंडेक्स दोन च्या प्रमाणीत प्रती आणलेल्या आहेत. त्यावर माझ्या सही आणि कार्यालयाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर

**नि. फौ. ख. क्र. १२/२०२१**
**सखुबाई वि. जगन्नाथ व इतर**
**निशाणी क्र. ३६**

अभिलेखाप्रमणे बरोबर आहे. सदर दस्त वर्णन यादी ३/४ ते ३/६ वर दाखल केले आहेत. त्यास अनुक्रमे **निशाणी ४१ ते ४३** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए.डी. वसेकर यांनी राखीव ठेवला.**

श्रवणोत्तर स्विकृती,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.08.28 16:04:53 +0530

दिनांक –२८.०८.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आटपाडी.